# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७७ वा ❑ मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## भारताचे कुटनीतीक पाऊल

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कौटिल्याच्या (चाणक्याच्या) शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नीतीचा अर्थ असा आहे की, आपल्या शत्रूचा शत्रू आपल्यासाठी एक संभावित मित्र असू शकतो आणि त्याचा उपयोग आपल्या फायद्यासाठी केला जाऊ शकतो. ही नीती राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत उपयोगी ठरू शकते.याचा प्रत्यय भारत अफगाणिस्थान वाढत्या संबंधात बघायला मिळत आहे.शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या कौटिल्याच्या कूटनीती शास्त्रानुसार भारताने पाकिस्तानचा शत्रू अफगाणिस्थान सोबत संपर्क वाढविला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तान दरम्यान तणाव वाढला आहे. भारत पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवण्याच्या तयारीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट शब्दांत त्यासंदर्भात पाकिस्तानला इशारा दिला आहे. जगभरातील राष्ट्रप्रमुखांसोबत भारताची चर्चा सुरु आहे. भारताने कुटनीतीचे अवलंबन करत पाकिस्तानचे विरोधक असलेल्या तालिबानसोबत चर्चा केली आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे संयुक्त सचिव आनंद प्रकाश यांनी काबूलमध्ये अफगाणिस्तानचे कार्यवाहक परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांची भेट घेतली आहे. या बैठकीत दोन्ही देशांमधील राजकीय संबंध, व्यापार आणि प्रादेशिक विकासासह अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध बिघडले असताना ही बैठक झाली आहे, त्यामुळे या बैठकीकडे जगाचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, अफगाणिस्तानात सत्तेत असलेल्या तालिबानचेही पाकिस्तान सरकारशी कटु संबंध आहेत.या पार्श्वभूमीवर भारताचे अफगाणिस्तानशी संपर्क एक कुटनितीक पाऊल मानले जात आहे.

या नीतीचा उपयोग राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत केला जाऊ शकतो. राजकीय धोरणे बनवताना, शत्रूच्या शत्रूचा वापर करून, आपल्या राजकीय प्रतिस्पर्धकांना कमजोर केले जाऊ शकते. अफगाणिस्थान मधील तालिबान सरकारला भारताने अजून पर्यंत मान्यता दिली नाही.

आनंद प्रकाश यांच्यासोबतच्या भेटीत अमीर खान मुत्ताकी यांनी अफगाणिस्तान आणि भारत यांच्यातील राजनैतिक आणि आर्थिक संबंध वाढवण्यावर भर दिला. त्यांनी भारतीय व्यवसाय आणि गुंतवणूकदारांना अफगाणिस्तानात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले आहे. मुत्ताकी म्हणाले की, अफगाणिस्तानमध्ये गुंतवणुकीसाठी चांगले वातावरण आहे. भारतीय गुंतवणूकदारांनी याचा फायदा घ्यावा. मुत्ताकी यांनी भारताला अफगाण व्यापारी, विद्यार्थी आणि रुग्णांसाठी व्हिसा पुन्हा जारी करण्याचे आवाहन केले.

भारतही संबंध वाढवण्यास उत्सुक आहे.

भारताच्या वतीने आनंद प्रकाश यांनी अफगाणिस्तानशी अनेक क्षेत्रात संबंध दृढ करण्याबद्दल बोलले आहे. त्यांनी मुत्तकी यांना अफगाणिस्तानात भारताकडून सुरू असलेल्या विकासकामात सहकार्य सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले. ऑगस्ट २०२१ मध्ये तालिबान सत्तेत आल्यानंतर रखडलेल्या नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याबद्दल आणि योजना पुन्हा सुरू करण्याबद्दलही त्यांनी बोलले आहे.

भारताने अलिकडेच अफगाणिस्तानातील तालिबान सरकारशी संबंध सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. भारताने काबूलमध्ये आपली राजनैतिक उपस्थिती वाढवली आहे. आनंद प्रकाश यांच्या काबूल भेटीतून अफगाणिस्तानात भारताचा प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी नवी दिल्लीचा धोरणात्मक दृष्टिकोन देखील दिसून येतो. भारत आणि पाकिस्तानमधील संबंध खूप तणावपूर्ण असताना, भारताला अफगाणिस्तानमध्ये आपला ताबा कायम ठेवायचा आहे. दरम्यान, काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल तालिबाननेही भारताचे समर्थन करणारे निवेदन जारी केले आहे. तालिबानच्या दोहा येथील राजकीय कार्यालयाचे प्रमुख आणि कतारमधील अफगाणिस्तानचे राजदूत म्हणून नियुक्त सुहेल शाहीन यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. सुहेल म्हणाले की, या घटनेची सखोल चौकशी झाली पाहिजे जेणेकरून खरे दोषी शोधून त्यांना शिक्षा करता येईल.

# सरकारच्या योजनांचे ऑडिट आणि सामाजिक कार्यात पत्रकार संघ पुढाकार घेणार – प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे

## जूनमध्ये संभाजीनगरला पत्रकार संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन !

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजी नगर ही मराठवाड्याची राजधानी ऐतिहासिक आणि विचारांची चळवळ निर्माण करणारी आहे. या मातीमध्ये अनेक जण घडले आहेत. सरकार अनेक योजना जाहीर करते मात्र पुढे त्या योजनांचा जनतेला काय फायदा होतो किंवा काय नुकसान झाले ? याचे ऑडिट आता आम्ही पत्रकार संघ म्हणून करणार आहोत. त्याचबरोबर वास्तव लिखाण जनतेसमोर आणण्या सोबतच सामाजिक समस्या सोडवण्यासाठी सुद्धा पत्रकार संघाचा पुढाकार भविष्यात असेल असे धोरणात्मक धोरण पत्रकार संघ राबवणार आहे असा आशावाद महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या पहिल्या विभागीय बैठकीत व्यक्त केला.

छत्रपती संभाजी नगर येथील गजानन नगर परिसरात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या विभागीय कार्यालयात शनिवार दिनांक २६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता मराठवाडा स्तरीय बैठक पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या बैठकीला मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष उपस्थित होते. सर्वप्रथम कश्मीर येथील पहलगाम येथील भ्याड हल्ल्याचा पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करून जे शहीद झाले त्या निष्पाप भारतीयांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर पहलगाम घटनेच्या पार्श्वभूमीवर पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांनी मराठवाडा विभागाच्या वतीने करण्यात येणारा सत्कार विनम्रपणे नाकारला.



पुढे बोलताना प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर म्हणाले, आपण आपल्या सकारात्मक कार्यातून पत्रकार संघाचा नवा चेहरा नव्याने उभा करू. प्रामुख्याने शासनाने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना जाहीर केली. या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये किती बहिणींना झाला ? आणि ही योजना खऱ्या अर्थाने बहिणींसाठी लाभदायक ठरणार आहे का ती सरकारसाठी लाभदायक ठरली ? याचे ऑडिट आता पत्रकार संघ हातात घेणार आहे. एवढेच नाही तर केंद्र आणि राज्य सरकारच्या ज्याही योजना सरकार जाहीर करते. त्या योजनांची अंमलबजावणी ग्रामीण भागापर्यंत कितपत यशस्वी झाली आहे यावरही आता पत्रकार संघाची नजर असणार आहे. जिल्हा नियोजन बैठकीमध्ये त्या जिल्ह्याच्या विकासासाठी किती कोटी रुपयांचा निधी शासनाच्या तिजोरीतून दिला गेला आणि तो त्या योजनांवर, विकासात्मक कामावर खऱ्या अर्थाने खर्च झाला का कोणाचे खिसे भरले गेले याचे ऑडिट सुद्धा करण्याचे काम आता पत्रकार संघ हातात घेणार आहे. या कार्यासोबतच महाराष्ट्रातल्या कोणत्याही पत्रकारावर कोणीही भ्याड हल्ला केला तर त्याच्या विरोधामध्ये पत्रकार संघ तेवढ्याच ताकदीने रस्त्यावर उतरून संघर्ष करेल असा थेट इशारा दिला. यापुढे पत्रकार संघाचे राज्यातील प्रत्येक विभाग स्तरावर रौप्य महोत्सवी अधिवेशन घेतले जाईल. महाराष्ट्रातील महिला पत्रकारांसाठी राज्यातील पहिले स्वतंत्र राष्ट्रीय स्तरावरील अधिवेशन पत्रकार संघ पुण्यात घेण्याचा प्रयत्न करेल, महिलांना देखील पत्रकार संघामध्ये सन्मानाचे पद आणि संघटनात्मक कार्यामध्ये सोबत घेतले जाईल अशी भूमिका जाहीर करून ते म्हणाले , महाराष्ट्रामध्ये सर्वात प्रथम मराठवाडा विभागाने प्रदेशाध्यक्ष म्हणून माझी निवड झाल्यानंतर माझा पहिला सत्कार आयोजित केला आणि माझ्या उपस्थितीमध्ये मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांना नियुक्तीपत्र दिले. यापुढे संघटनात्मक बांधणीमध्ये सुसूत्रता आणली जाईल. कोणीही परस्पर नियुक्त्या जाहीर करणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल. आणि छत्रपती संभाजी नगर शाखेने पत्रकार संघाचे राज्यस्तरीय रौप्य महोत्सवी पहिले विभागीय अधिवेशन घेण्याची जबाबदारी स्वीकारली त्याबद्दल अभिनंदन करून सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका जाहीर केली.

यावेळी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी पत्रकार संघाच्या मराठवाडा स्तरावरील वाटचालीचा लेखाजोगा स्पष्ट करून मराठवाड्यामध्ये सर्वाधिक सदस्य नोंदणी आणि मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरीय मेळावा त्याचबरोबर संभाजीनगर येथे पहिला विभागीय मेळावा घेण्याची परवानगी प्रदेशाध्यक्षांनी द्यावी, आम्ही स्वीकारलेली जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करू अशी ग्वाही दिली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य यांनी आपले विस्तृत मनोगत व्यक्त केले. तर मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांनी प्रास्ताविक करून मराठवाडा विभागाचे पहिले अधिवेशन संभाजीनगर येथे घेण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केली. त्यास प्रदेशाध्यक्षांनी सर्वानुमते मान्यता दिली.या बैठकीला पत्रकार संघाचे राज्यस्तरीय सदस्य रुपेश पाडमुख यांच्यासह यावेळी मनोज पाटनी, ज्ञानेश्वर खंदारे, सुजित ताजने, रवींद्र लांडगे, आनंद अंभोरे, ज्ञानेश्वर तांबे, देविदास कोळेकर, गणेश भाबर्डे, अशोक वाघ, आकाश सपकाळ, फिरोज शेख, संजय हिंगोलीकर, रमेश जाबा, चंद्रकांत चाबुकस्वार, संगीता राजपूत, सचिन अंभोरेसह मराठवाड्यातील प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सावंत यांनी केले तर सर्व उपस्थितांचे आभार डॉ. छबुराव ताके यांनी मानले.

### या पदाधिकाऱ्यांना प्रदेशाध्यक्षांच्या शुभहस्ते देण्यात आले नियुक्तीपत्र

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके, जालना जिल्हाध्यक्ष दिगंबर गुजर, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष गजानन मगर, बीडचे पत्रकार हल्ला कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा रफिक, बीड ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव वडवणी, लातूर शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, नांदेड दक्षिणचे जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत मुळे, नांदेड निवड समितीचे जिल्हाध्यक्ष केशव पवार, लोहा येथील ज्येष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे यांना मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष या प्रमुख पदाधिकाऱ्यांना त्यांच्या निवडीचे नियुक्तीपत्र प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या हस्ते देण्यात आले.

लक्षवेधी छायाचित्र....



माझ्या गोव्याच्या भूमीत गड्या
नारळ मधाचे कड्याकपारीमधोनी
घट फुटती दुधाचे माझ्या गोव्याच्या
भूमीत आंब्याफणसांची रास फुली
फळांचे पाझर फळी फुलांचे सुवास

(छाया : दिलीप देशपांडे, जळगाव)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मभूमी चौंडी येथे अभ्यास दौरा



ज्योतिर्मय साहित्य

**बीड** – पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्ष २०२४ – २५ निमित्त स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व पदाधिकारी यांचा अहिल्यानगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र चोंडी येथे अभ्यास दौरा संपन्न झाला. या वेळी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. दीपक देशमुख यांनी पुण्यश्लोक अहिल्या देवी यांच्या जीवन चरित्राची विविध प्रसंगातून माहिती दिली. धर्मयोगीनी अहिल्यादेवी यांचे प्रशासन, उद्योग, व्यवसाय, धार्मिक कार्य, विविध घाटांचे पुनर्निर्माण यासारखी संपूर्ण भारत वर्षात ही कार्य केली. त्यांनी सामाजिक समरसता निर्माण केली. काश्मीर ते रामेश्वरम पर्यंत त्यांनी कार्य केले. त्यांच्या कार्याचा आदर्श घेवून काम केले तर या अभ्यास दौऱ्याच्या उद्देश साध्य होईल, असे प्रतिपादन देशमुख यांनी केले.

अध्यक्षीय समारोप शालेय समिती अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी यांनी करताना सांगितले की, स्त्री मध्ये अदभूत शक्ती असते. ती शक्ती विविध प्रसंगातून अहिल्या देवी यांच्या चरीत्रात दिसून येते. त्यांचे समाज धर्माचे कार्य हा आदर्श घेवून आपण सदैव काम करूया असे प्रतिपादन कुलकर्णी यांनी केले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी व उपस्थिती विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, शालेय समिती अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, प्राचार्य विठ्ठल काळे, उपमुख्याध्यापक माधव जोशी, विभाग प्रमुख प्रा बाळसाहेब साळवे हे उपस्थित होते.

सूत्रसंचलन सौ. माधवी डोळे यांनी केले तर, प्रास्ताविक सौ. सुजाता चिंचपूरकर यांनी केले अहिल्यादेवी यांच्यावर आधारित गीत मुकुंद मिरगे यांनी गायिले . यात माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...


## ध्वनी प्रदूषण टाळावे

**ज्योतिर्मय साहित्य**

वाढत चाललेली लोकसंख्या, त्यांच्या गरजांची पूर्तता, पायाभूत सुविधांवर त्यानुषंगाने आलेला ताण, बदलती जीवनशैली ह्या सर्वाचाच परिणाम नागरीकरण आणि शहरीकरणावर कमी अधिक प्रमाणात सर्वच बाबतीत होत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. ही खरे तर खूप मोठी नागरी समस्या आहे, ह्या समस्येचा अत्यंत गांभीर्याने, प्राधान्याने अभ्यासपूर्वक विचार केला पाहिजे. अलीकडच्या काळांत सर्वत्र वाहत्या वाहतुकीचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. स्वायत्त वाहतूक व्यवस्था हे वाहतुकीच्या समस्येचे मूळ कारण असल्याचे न समजणे हीच उणिव म्हणावी लागेल. नागरी वाहतूक व्यवस्थेचा वापर ज्या ठिकाणी योग्य तऱ्हेने होत असतो, त्या ठिकाणी खाजगी स्वयंचलित वाहने रस्त्यावर कमी येतात, परिणामी हवेचे, ध्वनीचे प्रदूषण नियंत्रित ठेवता येते.

रस्त्यावरील वाहनांची संख्या वाढली कि, कर्णकर्कश हॉर्न आणि तेही गरजेशिवाय वाजवले जातात, वाहन जलद गतीने चालवण्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण, अनेकदा आकारण विशेषतः टू व्हीलर्स इकडून-तिकडून मोठमोठ्याने हॉर्न वाजवत फिरवल्या जातात. ह्याचा इतरांना त्रास होऊ शकतो ही जाणीव का बरे होत नाही? वाहतूक जेव्हा वाहती असते तेव्हा अनेकदा अशा समस्या उद्भवतच नाहीत. ह्यासाठी काय टाळायचे आणि काय पाळायचे हे समजून घेणे आवश्यक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य असूनही ह्याबाबतीत कोणीही अवाक शब्द काढू शकत नाही; अगदीच एखाद्याने काढलाच तर ह्या नेतेमंडळींसाठी तो त्यांच्या प्रतिष्ठेचा विषय बनून जातो. आनंदोत्सव साजरा करणे निश्चितच गैर नाही परंतू काळवेळ विचारांत घेणे, जनजीवन विस्कळीत न होऊ देणे तितकेच महत्वाचे असते. फटाकेबाजी करताना रस्ते आडवले जातात त्याचा पादचारी आणि वाहन चालकांना खूपच त्रास होत असतो, हे देखील विचारांत घेतले जात नाही.

## अनोखे अंदमान




**ज्योतिर्मय साहित्य**

रॉस बेटावरील ही मनमोहक सफर संपवून दुपारी आम्ही नॉर्थ बे या ठिकाणी आलो. हे ठिकाण तर अतिशय सुंदर आहे. आमचा संपूर्ण दिवस जणू निळ्या हिरव्या रंगाच्या स्वप्नात रंगला होता असे म्हणावे लागेल.

नॉर्थ बेच्या किनाऱ्यावर पाऊल टाकताच एका वेगळ्याच आनंदाच्या लहरी आपल्याला व्यापतात. पायांखालची शुभ्र वाळू, समोर फेसाळणाऱ्या लाटा, आणि आजूबाजूच्या झाडांवरून ऐकू येणारा सारस पक्ष्यांचा किलबिलाट जणू एक निसर्गसंगीत सुरू झालंय असं वाटतं.





इथेच ठरल्याप्रमाणे आमच्यातील पर्यटकांनी वॉटर स्पोर्ट्स चा आनंद लुटला. आमच्यातील जे वयाने तरुण होते त्यांनी साहसी वॉटर स्पोर्ट्सचा आनंद आणि थरार अनुभवला. आम्ही एका सेमी सबमरीनमध्ये बसून समुद्र तळाचे अद्भुत दृश्य पाहिले. जणू पाण्याखालील रंगपंचमीच आम्ही अनुभवात होतो. एक वेगळेच विश्व आमच्या डोळ्यासमोर होते. बोटीच्या काचेतून दिसू लागलं एक इंद्रधनुष्य. कोरल्सच्या विविध आकृती मेंदूच्या रेघांप्रमाणे, फुलांचं गालिचा वाटावा अशा रंगांमध्ये, विविध रंगी देखण्या माशांचे सुंदर थवेच्या थवे आमच्या समोरून पोहत जात होते हे सगळं एखाद्या कल्पनारम्य चित्रासारखं वाटत होतं.

या ठिकाणी पाणी इतकं पारदर्शक आहे की समुद्राच्या अगदी तळापर्यंत दिसू लागतं मग ते फक्त पाहणार पुरत नाही तर आपण त्या सौंदर्यात हरवून जातो.

दिवसाच्या शेवटी, किनाऱ्यावर बसून मी समुद्राकडे पाहत होतो. आता सूर्य कलतोय, निळ्या सागरावर आता सोनेरी रंगाची चादर पसरतेय. या सगळ्या वातावरणात माणूस स्वतःला विसरतो आणि निसर्गाश एकरूप होतो. रॉस आयलंड आणि नॉर्थ बे ही दोन वेगवेगळी ठिकाणे आम्ही आज पाहिली होती. अंदमानच्या या दोन बेटांनी मला केवळ दृश्य देऊन थांबवलं नाही, तर मनात खोलवर घर करून राहावं असं काहीतरी दिलं. हा प्रवास एका नाजूक हळुवार स्मरणासारखा आहे न बोलता खूप काही सांगणारा.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ब)

**ज्योतिर्मय साहित्य**

अधर्माने वागुन स्वतःच्या आयुष्याचे वाटोळे करून घेऊ नका. संयत धीर धर्मरक्षण,स्वकुळाचा ऊद्धार,

अतिलोभापायी वारेमाप धनसंपत्ती गोळा करणे सत्कर्म न करणे दानधर्म नकरणे, आहे त्या धनद्रव्याचा वापर योग्य प्रकारे न करता धनसंपदा साठवून ठेवणे. अशा अवस्थेत घरावर दरोडा पडला तर सगळं धनसंपदा चोर चोरून नेतात व हा कफल्लक होतो.

अशा रितीने वाईट मार्गाने मिळवलेला पैसा संपून जातो व हा माणूस रोगाचे भांण्डार बनतो. संपूर्ण शरीरात रोग पसरतो. केलेल्या पापाची फळे भोगण्याची वेळ येते.तारूण्यातील ऊन्माद संपतो शरीरभर किडे पडतात. कळाहीन देह,हातपाय झडलेले, शरीरात कंप भरलेला.अक्षरशः त्याच्या आसपास पण माणसे थांबत नाहीत सगळा किळसवाणा प्रकार पाहून याची अवस्था ना इहलोकी ना परलोकी अशी झाली. वाईट कर्माचे फळ असे मिळते.पुढच्या ओव्या मध्ये (२२ ते ४६) या ओव्या मध्ये रोगातून बरे होणे मुल होण्यासाठी नवस

सायास करणे थोडक्यात अंधश्रद्धा मनामध्ये ठेऊन करणी, गोसावी, बैरागी, चेटकाचे प्रयोगहीन मंत्रप्रयोग


करणे असे समाज विघातक कर्म त्याच्या कडून होते.

संपूर्ण समासाचा सार विचारात घेता अधर्माने वागू नका नितीधर्माचे पालन करा भगवंताशी एकरुप व्हायला विसरू नका. असेच समर्थ सांगतात.

सद्गुणांचा अवलंब करून देहाचे सोने करावे. भगवंताची ऊपासना करावी. हे या निमित्ताने सांगणे.

श्री राम जय राम जय जय राम।।

## संत आपल्याला जागे करतात



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्यक्ष विषयापेक्षा विषयी माणसाची संगत फार वाईट असते, हे ज्याप्रमाणे संसारात, तसेच परमार्थातही लागू आहे. संगतीचा परिणाम नेहमी मनावर होतो; म्हणून चांगल्या विचारांच्या माणसाची संगत धरावी. चांगले-वाईट हे नेहमी आपल्यावरूनच ओळखावे. स्वत:ला सुधारण्याऐवजी आपण जगाची सुधारणा करायला जातो हेच आपले चुकते. जगात संत असतील असे पुष्कळांना वाटतच नाही. संताला ओळखायला आपल्या अंगी थोडेतरी भगवंताचे प्रेम असायला पाहिजे. आपल्याला आपल्या ध्येयाचा विसर पडला, परंतु संतांनी आपल्याला जागे केले. चुकीची वाट चालत असताना, 'अरे, तू वाट चुकलास,' अशी जागृती संतांनी आपल्याला दिली. तेव्हा, जिकडे पाठ होती तिकडे आपण तोंड केले आणि पुन: चालू लागलो, तर आपण योग्य स्थळी जाऊ.

संत आनंदरूप झाल्यावर स्वस्थ बसत नाहीत. ते ज्या लीला करतात त्या जगाच्या कल्याणासाठी असतात. त्या वेळीही ते आपल्या मूळच्या आनंदातच असतात. ते स्वस्थ बसलेले दिसले तरी जगाचे कल्याण करीतच असतात. आपण धडपड करून फुकट मरतो, त्यापेक्षा ते स्वस्थ बसून जिवंत राहतात, हे केव्हाही चांगलेच होय. संत आनंदरूप झालेले असल्यामुळे त्यांच्या वचनानुसार आपण जाऊ या. लोकांना उपदेश करण्यामध्ये संतांचा हेतू एकच असतो, आणि तो हा की, 'जे मला कळले आहे ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या.' संत आपल्या स्वार्थासाठी सांगत नसल्याने, त्यांचे म्हणणे आपल्याला खोटे कसे म्हणता येईल ? प्रपंच हा दु:खमय आहे हे कळल्यावर त्यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. तो संतांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या वाचनाने कळतो. त्या ग्रंथात सांगितलेले आपण करावे. आपण ग्रंथामध्ये जे वाचतो ते जर आचरणात आणले नाही, तर त्या वाचनाचा उपयोग नाही. वाचनाचे मनन झाले पाहिजे. साधन व वाचन बरोबर चालावे.

ज्या संतांचा ग्रंथ आपण वाचतो त्यांच्या कृपेवाचून तो नीट समजणार नाही. ज्याच्यावर त्यांची कृपा आहे त्याला, अंगी विद्वता नसताना देखील, त्या ग्रंथांचा बरोबर अर्थ अगदी स्वाभाविकपणे कळेल. विद्वान् हा कल्पनेने सत्यस्वरूपाचे वर्णन करतो, पण संत मात्र निश्चयाने, खात्रीने आणि अनुभवाने ते रूप काय आहे हे सांगतात. सत्पुरुषांच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे.

संतांची आज्ञा पालन करणे म्हणजे संतसेवाच होय.




## आरोग्य वर्धक - एरंडेल तेल

**ज्योतिर्मय साहित्य**

एरंडेल तेल गेली हजारो वर्षे आयुर्वेद शास्त्रात निरनिराळ्या गोष्टींसाठी वापरले जात आहे. हे तेल वनस्पती तेल असते, जे शरीराच्या बाहेर व आत असे दोन्हीकडे वापरले जाते.

एरंडेल तेल गेली हजारो वर्षे आयुर्वेद शास्त्रात निरनिराळ्या गोष्टींसाठी वापरले जात आहे. हे तेल वनस्पती तेल असते, जे शरीराच्या बाहेर व आत असे दोन्हीकडे वापरले जाते. तेलाचा रंग हलका पिवळा असून ते थोडे चिकट व गिळगिळीत असते. याच कारणामुळे मध्यंतरीच्या काळात याचा वापर कमी होत गेला असावा. सध्या मात्र एरंडेल तेल वापराबद्दल जागरूकता वाढते आहे. हे तेल एरंड नावाच्या वनस्पतीच्या बियांपासून केलेले असते. बियांमध्ये तेल प्रचुर मात्रेत असते. बियांच्या टरफलात रिसिनिन नावाचे द्रव्य असते, जे त्रासदायक असते. पण तेलाच्या निर्मितीप्रक्रियेत हे द्रव्य तेलात येत नाही. एरंडेल तेलाची मुख्य चव गोड असते, तर अनुरस कषाय व तिक्त असतो. हे तेल गुणाने उष्ण, तीक्ष्ण व सूक्ष्म (शरीराच्या सर्व स्रोतसांमध्ये सामावण्यास सोपे), गुरू व पिच्छिल (चिकट) असते. दोषांचा विचार केला तर यामुळे शरीरातील वात व कफदोषाचे संतुलन व्हायला मदत होते.

आयुर्वेदात कुठल्याही रोगाचा इलाज करते वेळी शरीरशुद्धीला म्हणजे संतुलन पंचकर्मासारख्या शास्त्रोक्त पंचकर्माला खूप महत्त्व दिलेले आहे. एरंडेल तेलस्रोतविशोधन (शरीराचे सर्व स्रोतस म्हणजे सगळे ऑर्गन्स मोकळे करणे), अधोदोषहर (शरीराच्या खालच्या भागातले दोष विरेचन द्वारा बाहेर काढणे).

पोट साफ होत नसेल, पोटात गुबारा धरणे, मूळव्याध, पोटात दुखणे अशा वेळी १-२ चमचे एरंडेल तेल आल्याच्या चहाबरोबर किंवा गरम पाण्याबरोबर घेण्याचा उपयोग होताना दिसतो.

आम, कोलेस्टेरॉल ट्रायग्लिसेराइडस् वाढलेले असल्यास पचनाच्या दृष्टीने व शरीरातील आम कमी होण्याच्या हेतूने एरंडेल घेणे उपयुक्त ठरते. दोन वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लहान मुलांनाही अर्धा चमचा एरंडेल देणे उपयोगी ठरते. दोन वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे पोट दुखत असले, पोटात गॅसेस होत असले, शी साफ होत नसली तर शीच्या जागी एरंडेल लावल्यास बद्धकोष्ठता कमी व्हायला मदत मिळते, तसेच कृमी असल्यासही मदत होते. लहान वयापासूनच नाभीमध्ये एरंडेलाचे २-३ थेंब सोडल्याने गॅसेस कमी होतात व पचन सुधारायला मदत मिळते.

एरंडेल त्वचेसाठीही उत्तम सांगितलेले आहे. त्वचा फार कोरडी पडत असली, कुठला त्वचारोग असला, त्वचेवर काळे डाग वगैरे असले तर वैद्यांच्या सल्ल्याने हलक्या हाताने एरंडेल लावण्याचा उपयोग होऊ शकतो.

एरंडेल तेल शरीरातील वात कमी करते, तसेच रक्ताभिसरण वाढायला मदत करते. एरंडेल उष्ण गुणधर्माचे असल्यामुळे शरीराचे तापमान वाढायला मदत मिळते, शरीरातील शोथ कमी व्हायला म्हणजे सूज कमी व्हायला मदत मिळते, त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या हाडांशी व सांध्यांशी संबंधित दोषांमध्ये एरंडेलाचा फायदा होताना दिसतो. आमवात, गाऊट, कंबर दुखणे, गुडघा दुखणे अशा त्रासांमध्ये हलक्या हाताने एरंडेल लावण्याचा फायदा होताना दिसतो. **(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। संत - महात्म्य ।।

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

## संत जनाबाई

**ज्योतिर्मय साहित्य**

वैराग्य अभिमानें फिरविलें जातें ।
ह्मणवोनी यातें भाव खुंटा ।।१।।
संचित मातृका वैरणी घातली ।
अव्यक्तिं दळिलीं व्यक्ताव्यक्त ।।२।।
नामरुपा आदि दळियेलें सर्व ।
पीठ भरी देव पंढरीचा ।।३।।
नवल हा देव बैसला दळणीं ।
नाहीं केली जनी नामयाची ।।४।।

हा संत जनाबाई यांचा एक गोड अभंग आहे. वरपांगी पाहता, भगवंत त्यांच्या सहाय्यार्थ दळण दळून द्यायला जात्यावर येऊन बसला आहे, असे वाटत असले तरी, रूपकातून जनाबाई साधन



मार्गातील एक जटिल प्रक्रिया विशद करून सांगत आहेत.

दैनंदिन आयुष्यातील शब्द, हे रूपक म्हणून निवडणे आणि या माध्यमातून गुढार्थ जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हे पूर्वीच्या काळी संत करीत असत. या रूपका द्वारे सांगितलेले तत्त्वज्ञान सहजपणे आत्मसात होते हा त्यांचा अनुभव होता. त्याकाळी त्यांच्या समोर कदाचित तितकी प्रगल्भ जनता असेल. म्हणून रूपका मध्ये दडलेला गुढार्थ ते काढीत, पण आज आपण तितक्या खोलीपर्यंत जाऊन अर्थ काढत नाहीत, आणि वरवर जो अर्थ दिसतो तोच अर्थ आपण काढतो. यामुळे जनाबाई सारखी संतश्रेष्ठ आणि उत्कृष्ट साधक ही केवळ धुणी, भांडी करणारी एक सामान्य स्त्री होती. ती नामदेवाची दासी होती. आणि कदाचित नामदेवाच्या संगतीत ती थोडीफार भक्ती करीत असावी असाच आपला समज झालेला दिसतो.

या अभंगाचा मूळ अर्थ काय असावा ? याचा अदमास बांधण्याचा आपण आता प्रयत्न करू.

अभंगाची सुरुवात वैराग्य अभिमाने फिरविले जाते या पदाने होते. दळण ज्या जात्यावर दळायचे आहे ते वैराग्याच्या अभिमानाने फिरवल्या जाते असे म्हटले मग वैराग्य कशाला म्हणावे? तर आपण या शरीराला ''मी'' समजतो. देह म्हणजे मी अशी जाणीव आपल्या जन्मापासूनच दृढ होते. या देहास एक नाव दिल्या जाते. तेच नाव म्हणजे मी. तो देह म्हणजे मी. ही भावना आपल्यात दृढमूल होते. मग हा देह सजवावा, सुदृढ असावा, सुंदर दिसावा म्हणून आपण आटोकाट प्रयत्न करीत राहतो. आणि यातूनच मी म्हणजे केवळ देह ही सर्वथा असत्य गोष्ट आपण गृहीत धरतो.

एखादा व्यक्ती उदाहरणार्थ रामराव नावाचा व्यक्ती मरण पावला असेल व त्याचे प्रेत अंत्ययात्रे पूर्वी घरात पडून असेल तर आपण काय म्हणतो? रामराव गेले! ज्या देहाला आपण रामराव नावाने संबोधित करीत होतो, तो देह तर अजून आहे, मग आपण रामराव गेले असं कशासंबंधी म्हणतो. त्यावेळेला आपण सत्य बोलत असतो. रामराव म्हणजे तो आत्मा जो या देहात वांस करून होता. तो आत्मा निघून गेला, म्हणजे रामराव नावाचा आत्मा निघून गेला.

(क्रमशः)



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**पापान्निवारयति योजयते हिताय**
**गुह्यं निगूहति गुणान् प्रकटीकरोति।**
**आपद्गतं च न जहाति ददाति काले**
**सन्मित्रलक्षणमिदं निगदन्ति सन्तः ।।**

अर्थ - एक चांगला मित्र आपल्या मित्राला पापकर्मापासून निवृत्त करतो. त्याला हितकारी कार्यात नियुक्त करतो. त्याची गुह्यगोष्ट अप्रकट ठेवतो. त्याच्या गुणांना प्रकट करतो. मित्र संकटग्रस्त झाला असता, त्याला सोडून जात नाही. समयानुरूप सहकार्य करतो. संत सज्जन लोक चांगल्या मित्राची अशी लक्षणे सांगतात.

संतांच्या मते, चांगल्या मित्राची लक्षणे काय आहेत, या विषयी कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात सांगीतले आहे. आपला मित्र चूकीचे कार्य करीत असेल, तर त्याला त्यापासून परावृत्त करणे, आपल्या मित्राला योग्य कार्याकडे प्रवृत्त करणे, आपल्या मित्राने विश्वासाने जी गोष्ट आपल्याला सांगीतली, ती गुप्त ठेवणे, संकटकाळात मित्राला संकटात सोडून दूर निघून न जाणे अर्थात पलायन न करणे ही सन्मित्राची म्हणजे चांगल्या मित्राची लक्षणे आहेत, असे प्रतिपादन कवीश्रेष्ठ भर्तृहरी करतात.





**ज्योतिर्मय साहित्य**


रामानी कुश लव यांना आपल्या महालात निमंत्रित केले. पण कोणाच्या घरी जाऊ नका. मोबदला म्हणून द्रव्य घेऊ नका असे वाल्मिकींनी सांगून ठेवलेले असल्यामुळे रामांनी देऊ केलेले द्रव्य त्यांनी घेण्यास नकार दिला.

अयोध्या ही भक्तीची नगरी आहे, मिथिला ही कर्माची नगरी आहे. अयोध्या मनु निर्मित नगरी आहे. इथे अपमृत्यु होत नसत, कोणासही वैधव्य प्राप्त होत नसे, चोरी मारी नसे. कृत युगात स्त्री पुरुष संबंध आहे, संतान प्राप्ती आहे पण कृत युगात स्त्रीचे कौमार्य भंग पावत नसे. एका व्यक्तीने एक शेत विकत घेतले आणि तो त्या शेतात नांगरणी करू लागला त्याला नांगरणी करताना शेतात एक सोन्याच्या मोहरांचा हंडा सापडला. तो त्याने आधीच्या मालकास देऊ केला.तो आधीचा मालक म्हणे ही जमीन मी, त्यातील वृक्ष, माती सर्वा सहित विकली आहे त्यातून मिळालेले धन आता तुझे झाले.. दोघेही मला नको,मला नको म्हणून भांडायला लागले. ते रामाकडे गेले .रामास ते धन तुम्ही ठेऊन घ्या म्हणू लागले. राम म्हणाले माझ्या कोशात आधीच धन ठेवायला जागा नाही, मलाही नको. मग ते धन अयोध्येच्या चौकात ठेवले गेले व जाहीर केले की ज्याला कोणाला गरज असेल त्याने ते न्यावे.राम राज्यावर असे तोवर त्या धनास कोणीही स्पर्शही केला नाही.ते राम राज्य होते. तुकोबाराय बोलले रात्री दिवस आम्हा युध्दाचा प्रसंग आपल्या अंतर मन व बाह्य मन यात युद्ध चालू असते.आमचे अंतः करण म्हणजे रणांगण आहे. येथे सतत युद्ध चालू असते.हे युद्ध जोवर चालु आहे तोवर प्रभू अंतःकरणात कसा प्रकटेल?. **(क्रमशः)**

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

वरदासुंदरीला तिच्याकडे राहत असणारे सुचरिता आणि सतीश ही मुले आवडत नाहीत. परेशबाबू उदार मनाचे असतात तर वरदासुंदरी ही त्यामानाने संकुचित विचारांची आहे. त्यामुळे जेव्हा सुचरिता आणि सतीश दुसरीकडे राहायला जातात तेव्हा तिला आनंद होतो. तिला वाटते की सुचरिताने हरणबाबुशी विवाह करावा आणि ब्राह्मो समाजात यावे. याच दरम्यान गोरा परेशबाबू यांच्या कुटुंबात जात येत असतो. तो आणि सुचरिता एकमेकांकडे आकर्षित होतात. पण गोराच्या डोळ्यापुढे देशसेवेचे ध्येय असल्यामुळे तो या नात्यात पुढे जात नाही. परेशबाबू आणि वरदासुंदरीची मधली मुलगी ललिता स्वतंत्र विचाराची असते. ती विनयकडे आकर्षित होते आणि त्याच्याबरोबर समुद्र सफरीवर जाते. विनय आणि ललिता एकमेकांशी लग्न करतात. या गोष्टीमुळे ब्राह्मो समाजात खळबळ उडते. गोरा हा कट्टर हिंदू असल्यामुळे त्याला जेव्हा ही गोष्ट कळते तेव्हा तो संतापतो, अस्वस्थ होतो परंतु नंतर या गोष्टीचा स्वीकार करतो.

कृष्णदयाळ मरताना गोराला आपल्याजवळ बोलावून घेतात आणि त्याला सांगतात की मी मेल्यानंतर तू माझे श्राध्द करू शकणार नाहीस कारण तू माझा मुलगा नाहीस. हे कळल्यावर गोराला प्रचंड धक्का बसतो आणि तो आपल्या आईला म्हणजे आनंदमयीला विचारायला जातो. मग त्याला त्याच्या जन्माची सगळी हकीगत कळते. आपण आयरीश आहोत हेही त्याला कळते आणि आनंदमयीच्या महानतेची त्याला कल्पना येते.

या कथेत आनंदमयीचे पात्र रवींद्रनाथांनी फार सुंदर चितारले आहे आणि त्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. आनंदमयी ही भारत मातेचे प्रतिनिधित्व करते. ती मदर इंडियाची प्रतिमा आहे. सुरुवातीला कट्टर सनातनी हिंदू असलेली आनंदमयी आपल्या नंतरच्या जीवनात बदलते आणि उदार हृदयी होते सर्व धर्म, पंथ, जाती यांना समान मानू लागते. या कादंबरीत हिंदू आणि ब्राह्मो समाजाचा संघर्ष दाखवला आहे. आनंदमयी ही हिंदू समाजाची प्रतिनिधी आणि परेशबाबू हे ब्राह्मो समाजाचे प्रतिनिधी दाखवले आहेत. यातील खलनायक हरणचंद्र बाबू उर्फ हरण हा आहे.

ब्राह्मण कुटुंबात वाढलेला आणि संस्काराने हिंदू असलेला गोरा जन्माने मात्र आयरिश आहे. ब्रिटिशांनी भारतावर केलेल्या अन्यायाबद्दल त्याच्या मनात प्रचंड संताप आहे तो राष्ट्रभक्त आहे. आणि भारतमातेसाठी वाटेल ते करण्याची त्याची तयारी आहे. भारताची सामाजिक, आर्थिक प्रगती होण्यासाठी तो शर्थीने प्रयत्न करतो. त्याच्या रूपाने एका देशभक्ती करणाऱ्या तरुणाचे तेजस्वी चित्र रवींद्रनाथांनी रेखाटले आहे परंतु ज्यावेळी गोराला आपण आयरिश असल्याचे कळते, तेव्हा मात्र तो मनाने खचतो आणि त्याचे प्रयत्न लुळे पडतात.

रवींद्रनाथांनी ही कादंबरी ज्या काळात लिहीली त्या काळात हिंदू आणि ब्राम्हो समाजात संघर्ष सुरू होता. त्याची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. त्या काळात असलेले जातीभेदाचे विष आजही लोकांच्या मनात खोलवर रुजलेले आहे. या पार्श्वभूमीवर रवींद्रनाथांनी रेखाटलेले आनंदमयीचे पात्र मात्र अद्भुत आहे. काळाच्या मानाने ती पुढचं विचार करताना दिसते. गोराला मुलगा मानून प्रचलित धर्म आणि जातव्यवस्थेच्या पलीकडे विचार करण्याची तिची क्षमता दिसते. म्हणूनच काही विचारवंतांनी या कादंबरीला आधुनिक महाभारताची उपमा दिली आहे. या कादंबरीवर चित्रपट आणि दूरदर्शन मालिकाही निघाल्या आहेत.

# इतर भाषांचा पर्याय ही लोकांची फसवणूक, दिशाभूल

## मसापच्या बैठकीतला एकमुखी सूर

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** शालेय शिक्षणात पहिल्या वर्गापासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य सरकारने स्थगित केला असला तरी मराठी भाषेच्या अस्तित्वावर घाला घालणारा हा निर्णय पूर्णत: रद्द झाला पाहिजे. त्यात कोणतीही राजकीय चालाखी नको, अशी मागणी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीने रविवारी, २७ रोजी येथे केली.

राज्य शासनाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर विचारविनिमय करण्यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाची तातडीची विशेष बैठक परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी परिषदेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर वरील मागणी करतानाच राज्य शासनाचा हा निर्णय रद्द करण्यासाठी मराठवाडा आणि राज्यभरातील मराठी भाषिकांचा लढा उभारण्यात मराठवाडा साहित्य परिषदेने पुढाकार घ्यावा, असा निर्णय कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने





मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांची वेगवेगळी वक्तव्ये जनतेसमोर आली आहेत. मुख्यमंत्र्यांनी मराठीसोबत दिलेले इतर भाषांचे पर्याय हे लोकांची फसवणूक व दिशाभूल करणारे असल्याची भावना परिषदेच्या कार्यकारी मंडळाने बैठकीमध्ये व्यक्त केल्याचे परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य ठाले पाटील यांनी सांगितले.

**दुर्दैवी आत्मघातकी निर्णय**

महाराष्ट्रात मराठी भाषेच्या राज्यात पहिलीपासून हिंदी भाषेचे शिक्षण सक्तीचे करण्याचा महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय केवळ दुर्दैवीच नव्हे तर आत्मघातकीही आहे, हे निदर्शनास आणण्यासाठी परिषदेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री आणि इतर संबंधित मंत्र्यांना सविस्तर निवेदन पाठविण्याचा निर्णय मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या भाषा सल्लागार समिती नेही शासनाकडे हा निर्णय रद्द करण्यासंबंधीची आपली स्पष्ट भूमिका कळविलेली आहे, असे समजते. यानंतरही शासन आपल्या हिंदीवादी धोरणावर कायम राहिले तर मराठी भाषेवर हिंदी भाषेचे गेल्या काही वर्षांपासून होत असलेल्या आक्रमणाचा जोर अधिक वाढणार असून ते मराठी भाषेच्या अस्तित्वालाच नख लावणारे ठरेल हेही शासनाच्या लक्षात आणून द्यावे, असे स्पष्ट मत कार्यकारिणीने व्यक्त केले आहे. जर शासनाने मराठी भाषिकांच्या भावना लक्षात घेऊन हिंदी भाषा सक्तीचा निर्णय रद्द केला नाही तर मराठी राज्यातील भाषाविषयक काम करणाऱ्या साहित्य संस्था, मराठी पत्रकार संघटना, वाचक चळवळी, मराठी गंथालये आणि यासदृश संस्था आणि मराठी भाषेचे अभ्यासक व वाचक यांना एकत्र आणून व्यापक मोहीम हाती घ्यावी आणि शासनाच्या हा निर्णयाविरुद्ध महाराष्ट्रभर आंदोलन करावे आणि यासंबंधीचा पुढाकार मराठवाडा साहित्य परिषदेने घ्यावा, असा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. तसेच राज्यातील काही मंत्री या निर्णयाच्या अनुषंगाने उलटसुलट विधाने करीत असून, मराठी भाषिकांच्या मनात संभ्रम निर्माण करीत आहेत, याबद्दल बैठकीत तीव्र नापसंती व्यक्त करण्यात आली.

बैठकीला अध्यक्षांशिवाय कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, सहकार्यवाह डॉ. दीपा क्षीरसागर, माजी उपाध्यक्ष किरण सगर, सदस्य संजीव कुळकर्णी, देवीदास फुलारी, डॉ. समीता जाधव, संतोष तांबे, दगडू लोमटे, डॉ. हंसराज जाधव, डॉ. दिलीप बिरुटे, प्रभाकर साळेगावकर, सरोज देशपांडे आदी सदस्य उपस्थित होते. मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील परिषदेच्या शाखांमार्फतही शासनाचा हिंदीभाषा विषय अनिवार्य करण्याचा निर्णय रद्द होण्यासाठी लोकजागृती करण्यात यावी, असे बैठकीत ठरले. डॉ. गणेश मोहिते यांनी आभारप्रदर्शन केले.

# चैत्रपालवी विशेषांकाचे प्रकाशन वाशीमध्ये उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**वाशी –** अखिल भारतीय साहित्य परिषदेची शाखा असलेल्या नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे चैत्र पालवी विशेषांकाचे प्रकाशन योग विद्यानिकेतन येथे संपन्न झाले. सुरवातीला पहेलगाम येथे अतिरेकी हल्ल्यात निष्कारण बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी घराचे स्वप्न साकार करणारी माणसे, नॅनो हाऊसिंगचे प्रणेते अणूशास्त्रज्ञ श्री सुरेश हावरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लेखकाने लिहिता झाले पाहिजे, लिखाण हे चिरंतन असते, व्यक्तीच्या पश्चातदेखील त्याचे लिखाण अजरामर राहत असते. लिखाणाच्या माध्यमातून व्यक्ती अमर होत असते. दुःख आणि करुणा हृदयात असल्याशिवाय लेखनात ती प्रकट होत नाही. या संदर्भात त्यांनी बाबासाहेब पुरंदरे यांचा संदर्भ देऊन स्पष्टीकरण केले. चैत्रपालवीचा हा पाचवा विशेषांक. याचे वैशिष्ट्य म्हणजे या अंकामध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व जिल्ह्यातून प्रतिनिधित्व आल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अमेरिकेतून देखीलऑनलाइन माध्यमातून एक लेख प्राप्त झालेला आहे. नवोदित साहित्यिकांना प्रेरणा देण्यासाठी सुरू असलेल्या यज्ञामध्ये या विशेषांकाच्या माध्यमातून भरीव असा प्रयत्न करण्यात आला. प्रकाशन समारंभानंतर सौ. कोमल बापट फडके यांच्या सुमधुर वाणीतून राम कथा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. भक्ती श्रद्धा यांचे अमोल नाते असलेल्या शबरीमाता यांचे चरित्र त्यांनी थोडक्यात कथन केले. आधुनिक काळामध्ये समाज एकत्र येण्यासाठी कथा कीर्तन प्रवचनांची कशाप्रकारे आवश्यकता आहे याचे प्रतिपादन त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा गवस मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे





प्रास्ताविक संतोष मिसाळ सर यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये नवी मुंबई साहित्य परिषद करत असलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. आभारप्रदर्शन दिलीप जांभळे यांनी केले. डॉ.अरुंधती जोशी यांनी चैत्रपालवी अंक संपादक या भूमिकेतून मनोगत व्यक्त केले. या अंकामध्ये ज्या साहित्यिकांनी लेखन केले होते त्या सर्वांना अंक आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी डाळ व पन्हे देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमासाठी मुंबई व नवी मुंबईतून अनेक साहित्यिक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. मराठी साहित्य मंडळाचे सुभाष कुलकर्णी, मीनल वसमतकर, शैलजा करोडे, कल्पना देशमुख, पत्रकार/लेखक प्रदीप बडदे, कविता डॉट कॉमचे रवींद्र पाटील, टीजेएसबी बँकेचे पदाधिकारी विवेकानंद संकुलाचे वावळ सर, मनीष कुलकर्णी, अनुकूल माळी, अक्षता गोसावी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# इच्छापूर्तीचा कल्पवृक्ष – विचार नियम

**ज्योतिर्मय साहित्य**

केवळ एक विचारही आपल्या जीवनाला आकार देऊ शकतो. आपल्यातील सर्वोत्तम शक्यता कशा विकसित होतात याचे महत्त्वपूर्ण तीन भाग.

१.विचारप्रती सदैव सजग रहा.

विचारनियम जोडा. सर्व अलिखित नियम आपापल्या पद्धतीने कार्य करतात.

२. सदैव आनंदी राहा. जोडा. आपण जेव्हा खुश असतो तेव्हा सकारात्मक चुंबक बनतो.

३. विचारांच्या स्तोत्र शी संलग्न राहा. मौन जोडा. मौन व्यक्तीला कोलाहल व शांतीच्या पलीकडची स्थिती आहे. तेथूनच रचनात्मक आणि सर्जनात्मक विचारांची निर्मिती होते. जे खूप शक्तिशाली आणि परिणामकारक असतात.

४. जसे आपले विचार असतील तसेच लोक आणि घटना आपल्या जीवनात आकर्षित होतात.विश्वात कोणतीही वस्तू भौतिक रूपात निर्माण होण्याआधी प्रथम तिची निर्मिती स्त्रीत्राद्वारे वैचारिक स्तरावर होते. कोणत्याही गोष्टीच निर्माण दोन वेळा होत. प्रथम विचारात आणि मग वास्तवात. आपल्या आत अनेक मन आहेत. चेतन मन,अर्धचेतन मन, अचेतन मन, अतिचेतन मन.


विचारांद्वारे प्रकट होणारी एखादी गोष्ट प्रकट होते.ते वास्तव असते.

विचारांच प्रोग्रामिंग. बालपणी अज्ञानता आणि दुःखात होत असते. ज्याला असे संबोधले गेले. या विचारांना गुड प्रोग्रामिंग करून बदलायला हवं. एकच विचार वारंवार उच्चारल्याने तो अंतर्मनातील पोहचतो. आणि मग यालाच मनाची प्रोग्रामिंग म्हणतात. हे सकारात्मक किंवा नकारात्मक असू शकते.

विचाराद्वारे विचारांमुळे निर्माण होणाऱ्या आजारांना सायकोसोमॅटिक डिसऑर्डर म्हणतात.

जे विचार होश आणि जोश मध्ये केले जातात ते वास्तवात बदलतात.

विचारसूत्र : अत्यंत स्पष्टता पूर्वक आणि सजगतेने विचार करा. आपल्या विचारात तीव्रता आणा. सकारात्मक विचारांची पुनरावृत्ती करा.आपल्याला हव्या असणाऱ्या गोष्टीवरच लक्ष केंद्रित करा. अनावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष करा.





मला माझ्या जीवनात असेच लोक हवे आहेत जे माझी भक्ती वाढवतील. ज्यांना पाहून मला माझे उद्दिष्ट आठवेल. मला माझ्या जीवनात प्रेम, आनंद आणि उच्च चेतनेविषयी बोलणारे लोक हवेत.

आयुष्यात नकारात्मक घटना घडत असताना सकारात्मकतेवर लक्ष केंद्रित करावं.

सकारात्मक शब्द. परंतु पद्धत शक्तिशाली प्रेरणादायी वाक्य.भूतकाळातील नकारात्मकतेवर दुर्लक्ष करून सकारात्मकेवर लक्ष केंद्रित करा. हे जग तस नाही जस आपल्याला दिसतं तथापि अस आहे जसे आपले विचार असतात.

ज्या नकारात्मक विचारांच्या साच्यामुळे झाला आहे .ती कारणीभूत ठरणारा वैचारिक साचा मी सोडण्यास तयार आहे.

सर्वकाही भरपूर आहे.आपण तोपर्यंत सहजतेने सर्वोचाकडे अग्रेसर होत जातो जोपर्यंत आपले भाव विचार वाणी आणि क्रियेद्वारे नैसर्गिक प्रवाहात कुठली बाधा बनत नाही. नकारात्मक विचार नाहीसे करणे महत्त्वपूर्ण आहे. भूतकाळ संपलाय वादळ शमल आहे म्हणून मी आता शांत आहे. ज्या विचारांमुळे माझ्यामध्ये भय निर्माण झालं होत त्या भीतीदायक विचारानं मी तीनदा कॅन्सल म्हणून नष्ट केलं आहे. आता ते विचार चुकूनही माझ्या मनाला स्पर्श करणार नाहीत. प्रत्येक क्षणी माझ्यावर फक्त सकारात्मक विचारांचाच पगडा राहील. नकारात्मक विचारांच उपवास करू या.

एखाद्या मनुष्यावर इतरांच्या विचारांचा परिणाम तोपर्यंत होत नाही जोपर्यंत तो स्वतः होऊ देत नाही. माझ्या विचारामुळे किंवा प्रार्थनामुळे इतरांच्या दिव्य योजनेत बाधा पडता कामा नये. माझी प्रार्थना कधीही कुणाच्या दिव्य योजनेच्या विपरीत नसावी. कारण समोरचा माणूसही जिवंत असून त्याच्या स्वतःच्याही काही इच्छा आकांक्षा आहेत.समान विचारधारा असणारे लोकच एकमेकांकडे आकर्षित होतात. आपापसात ताळमेळ सामंजस्य असणारे लोकच एकमेकांकडे आकर्षित होतात हे वास्तव आहे. नेहमी सकारात्मक शब्दांचा आशादायी व प्रेरणादायी शब्दांचा उपयोग करायला हवा. असत्य आपल्या शब्दांची शक्ती हिरावून घेतं असते तर सत्य आपल्या शब्दांची शक्ती वृद्धिंगत करत आपल्या जीवनातून चुगली, एखाद्यावर आरोप करणं परनिंदा शिव्या शाप अपशब्द यांना कायमचं हद्दपार करून टाका. रिपोर्टर बनले पाहिजे. सकारात्मक बीज नक्कीच पेरा. आशेची ज्योत तेवत ठेवणं कधीही श्रेयस्कर . आपल्यातील सर्वोच्च शक्यता प्रकट होण्यासाठी आपले भाव विचार वाणी आणि क्रिया यांच्यात एकरूपता आणा. प्रत्येक समस्येचे निराकरण आहे आणि तेही आपल्याच अंतरंगात आपल्याजवळ प्रत्येक गोष्ट बदलण्याची शक्ती आहे. वाणीविषयी सजग राहा. क्रियेविषयी सजग राहा. आपल्या इच्छेविरुद्ध कोणतही काम करू नका. जेव्हा आपल्या चेतनेचा स्तर कमी असेल आपण दुखी असाल तेव्हा स्वतःच्या विचारांवर विश्वास ठेवता कामा नये.आनंदी राहा. हॅप्पी जोडा. गुड मॉर्निंग पीस बना.



**पुस्तक परीक्षण**

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

जीवनरूपी नदी जेव्हा वाहत असते तेव्हा समस्यरूपी लहान लहान दगड त्यात बाधा बनतात. आपण जर त्या समस्येचे निराकरण आनंदाने केले तर नदीच्या प्रवाहात अडथळा येणार नाही. आपण आनंदाने स्वीकार केल्यावर नदीचा प्रवाह स्थिर राहतो.स्वीकार करणे म्हणजे परिस्थितीला सामोरे जाणे होय पलायन करणे नव्हे. धन्यवाद हा शब्द जरी छोटा असला तरी कमालीचा जादूई आहे.धन्यवाद हे निसर्गाचे विश्वास रूपी बीज आहे. धन्यवाद म्हणताच विपुलतेच चक्र तुमच्या जीवनात सुरू होतं. त्यानंतर मुबलकता आकर्षित होते. आनंद वाढतो. समृद्धीच चक्र धन्यवाद म्हणताच सुरू होत. धन्यवाद शब्दामुळे निसर्गात परिवर्तन होतं. शाश्वत आनंदाकडे प्रस्थान होते. चांगुलपणा वाढतो. मनःपूर्वक भावनेचा अंतर्भाव जर धन्यवाद म्हणताना असेल तर नक्कीच आश्चर्यकारक बदल होऊ शकतात. विचारांच्या स्तोत्र संलग्न राहा मौन जोडा. ध्यान मौन आवश्यक आहे. निर्विकार मन लाभण्यासाठी.

विचारांचा मंत्र. तुलनात्मक मन प्रत्येक गोष्ट दोन भागात विभाजित करते. चांगलं वाईट, काळा पांढरा, योग्य अयोग्य, सुख दुःख, लहान मोठा,फायदा नुकसान इत्यादी.

ए म्हणजे अच्छे चांगले विचार

बी म्हणजे वाईट विचार

सी म्हणजे. क्लिनर मनाची शुद्धता वाढवणारे विचार

डी. धुंद सभ्रमित करणारे विचार

मी कोण आहे ? विचार कुठून येतात? मी आहे ध्यान . विचार माझा सात्विक हवा.

हे पुस्तक अतिशय समृद्ध आहे. प्रत्येकाने वाचा.

पुस्तकाचे नाव. विचार नियम
The power of happy thoughts
लेखकाचे नाव. सर श्री
प्रकाशक.
पृष्ठ संख्या. १७२ किंमत. २५०

# भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त आज प्रतिमापूजन व शोभायात्रा

## ब्राह्मण समन्वय समितीतर्फे विविध उपक्रमाचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** ब्राह्मण समन्वय समिती आयोजित दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी भगवान परशुराम जन्मोत्सव समिती विविध उपक्रमांनी साजरी होत आहे. मंगळवार, २९ रोजी सकाळी ९ वाजता क्रांतीचौक येथे प्रतिमापूजन करण्यात येणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता वरद गणेश मंदिर समर्थनगर येथून शोभायात्रेस सुरुवात होईल. सावरकर स्मारक, निराला बाजार मार्गे, पैठण गेट, टिळक पथ येथून परशुराम चौक संभाजीपेठ येथे समारोप होईल. अशी माहिती ब्राह्मण समन्वय समिती २०२५ तर्फे अध्यक्षा विजया कुलकर्णी, स्वागताध्यक्ष ॲड. आशुतोष वसंतराव डंख, समन्वयक प्रमोद झाल्टे, निमंत्रक सचिन वाडेपाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भगवान परशुराम जन्मोत्सवात विविध संघटना सहभागी होणार आहे. यामध्ये अखिल भारतीय पेशवा संघटना, शुल्क यजुर्वेदी ब्राह्मण संघटना, ब्राह्मण महिला मंच, कण्व ब्राह्मण समाज, ब्राह्मण महासंघ, ऋग्वेदी ब्राह्मण संघटना, ब्रहावृंद वधुवर सुचक केंद्र, राजस्थानी विप्र मंडळ, ब्राह्मण सेवासंघ, ब्राह्मण जागृती मंडळ, आजूबाई संस्थान, सावरकर विचारमंच, साईसमर्थ सेवाभावी संस्था, समर्थ रामदास विचार मंच, बीबीएनजी, पीबीएन, कान्य कुंज ब्राह्मण समाज, समर्थनगर ब्राह्मण समाज, बेगमपुरा ब्राह्मण समाज, ब्राह्मण बिझनेस क्लब, विश्व फाऊंडेशन, शिवपुरी, अक्कलकोट, समर्थनगर महिला मंडळ, समतानगर महिला मंडळ, अग्नीहोत्र गृप संभाजी नगर, ब्रह्म उद्योजक, पेशवा ढोल पथक, अनेक संघटना स्वतः चे रथ व सजीव देखावे सादर करणार आहे.

कार्यकारिणी पूढीलप्रमाणे

अध्यक्षा विजया प्रविण कुलकर्णी, स्वागताध्यक्ष ॲड. आशुतोष डंख, कार्याध्यक्ष, विजय काजे, अमृता पालोदकर, क्षमा राजू वैद्य, मीना झाल्टे, डॉ. प्रतिमा भाले, सुषमा पाठक, राजश्री कुलकर्णी, वंदना कुलकर्णी, संध्या कापसे, अंजुषा कुलकर्णी, सुनीता नारले, प्रतिभा कुलकर्णी, ॲड. निशा महाजन, शैलेश देशपांडे, ॲड. आलोक शर्मा, दत्तात्रेय सुभेदार, विजय मिश्रा, संतोष जोशी, शरद कुलकर्णी, डॉ. महेश मोहरिर, अक्षय विजय हूलसुरकर, सुनील मंडलिक, दत्तात्रय पिंपळे, सुहास ठोसर, आशुतोष देव, विजय मिश्रा, तिवारी, उपाध्यक्ष, संतोष कुलकर्णी, महेश कुलकर्णी, मुकुंद गोलटगांवकर, आशिष मीरजगावकर, पूर्वा जोशी, राजश्री एरंडे, जयश्री चोबे, उज्वला पैठणे, रसिका देवळाणकर, ॲड. कल्पलता भारसवाडकर, दीप्ती देशपांडे, धनंजय नारळे, ॲड.गणेश अनसिंगकर, लक्ष्मीकांत राजुरकर, गोविंद गालफाडे, प्रदीप सोहनी, सुरेंद्र मंडलिक, मोहन योगी, योगेश धर्माधिकारी, अनिरुद्ध पांडे, अनंत नेरळकर, चिटणीस डॉ. प्रज्ञा दंडे, डॉ. चारूलता रोजेकर, वनिता खंडाळकर, वंदना देशमुख, मनिषा खडके सारिका पाठक, दीपक कुलकर्णी, काशिनाथ चांदजकर, ॲड. मनोज कड़तू, आर. के. जोशी, महेश गुळवेलकर, देवदत्त रुपलग, अक्षय गोलटगांवकर, प्रशांत अत्रे, सरचिटणीस रश्मी कुमठेकर, वनिता हासेगावकर, मनिषा देशपांडे, स्मिता भाले, गायत्री दसरे, लक्ष्मीकांत पांडे, मुकुंद कुलकर्णी, अर्जुन मिश्रा, साक्षी काळे, जयेश तिवारी, सौरभ नाईक, समिर नाईक, रविंद्र तिवारी, मार्गदर्शक (पत्रकार) योगेश गोले, सुधीर पेडगांवकर, सुधीर महाजन, प्रशांत तेलवाडकर, धनंजय कुलकर्णी, धनंजय ब्रह्मपुरकर, रवि खंडाळकर, प्रकाश जोशी, उमेश जोशी, मकरंद कुलकर्णी, विद्या धनेश्वर, मार्गदर्शक –विजया रहाटकर, विवेक देशपांडे, राम भोगले, शिरीष बोराळकर, मिलींद कंक, रविंद्र वैद्य, पांडुरंग कुलकर्णी, लक्ष्मीकांत थेटे, प्रवीण कुलकर्णी, राजु वैद्य, गणू पांडे, संजय जोशी, ऋषिकेश भालेराव, सुरेंद्र कुलकर्णी, सुहास दाशरथे, सतीश वैद्य, मिलिंद बापट, बंडु ओक, नरेंद्र त्रिवेदी, सी. बी. कुलकर्णी, राजेंद्र पिंपळे, विकास कुलकर्णी , लता दलाल, दिलीप देशमुख, राजीव जहागिरदार,




डॉ.प्रफुल मीरजगावकर,

प्रकाश मालखरे, गणेश जोशी, सुरेश पारीक, राजेन्द्र शर्मा, सुनील खोचे, सविता कुलकर्णी, जयश्री कुलकर्णी, किरण शर्मा, संकेत शेटे, विनय देशमुख, मकरंद कुलकर्णी, माधुरी अदवंत, मंगलमूर्ती शास्त्री, गोपाळ कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, निनाद खोचे, मुकुंद दामोदरे, प्रशांत जोशी, सदस्य भाग्यश्री बांळखे, स्वाती जोशी, रंजना सामग, अनघा नाईक, मनिषा कडेपुरकर, सविता नाईक, अंजली मुळे, जयश्री डफळापुरकर, आदिती दाशरथी, शितल तांबोळी, तनिषा पराडकर, ज्योती कुलकर्णी, सविता देशपांडे, शांभवी देशपांडे आदींचा समितीत समावेश आहे.

# हीच आमुची प्रार्थना...

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रार्थना म्हणजे काय तर देवाशी किंवा कुठल्याही अलौकिक शक्तीशी संवाद साधून आपल्या मनात साचलेले सगळे भाव त्याच्यापुढे रिक्त करायचे आणि आपल्याला जे इच्छित आहे त्याची मागणी मनापासून करायची..

काळ कोणताही असो जिथे चांगले तिथे वाईट होतेच..राम होता तिथे रावण होता..कृष्ण होता तिथे कंस होता..पांडव होते तिथे कौरव होते..ही काही उदाहरणे झाली..अगदी अलीकडच्या काळात शिवाजी होता तिथे औरंगजेब होता..



सौ.माधुरी म.इनामदार
मिरज

एकूण काय या सृष्टीत कोणत्याही कालखंडात संपूर्ण रामराज्य (हे ही काही काळच होते) किंवा पूर्णपणे सगळीकडे चांगलेच लोक होते असे कधीही झालेले नाही..हे अगदी खरे की चांगल्या लोकांना झगडावे लागले ,त्रास सहन करावा लागला पण शेवट सत्याचा होतो आणि चांगुलपणाच जिंकतो हे प्रत्येक काळाच्या पानावर कोरले गेले आहे..

पण हे आपणा सर्वांनाच माहीत असूनही किती जण आपल्या वर्तनात चांगल्या आणि सत्य गोष्टी असाव्यात याचा विचार करतात हा एक गहन प्रश्न आहे..कारण जीवनात आपण कसे आहोत हे दाखविणे महत्वाचे आहे की तसे असणे महत्वाचे आहे हे आधी समजले पाहिजे..

अलीकडच्या काळात तर केवळ राजकारणात नव्हे तर सगळीकडे गुरू आणि त्यांची अंध पूजा करणारे चेले दिसतात.चुकीचे,अनैतिक आणि पैशाच्या कधी सत्तेच्या जोरावर कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे इतरेजणांना खेळवणाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे..आणि त्या प्रवाहात वहावत जाणाऱ्यांचीही तितकीच आहे..

प्रवाहाविरुद्ध लढणाऱ्या लोकांना एक तर बाहेर फेकले जाते.किंवा त्यांना शक्य तितका त्रास देणे सुरू राहते..त्यामुळे बहुतेक जण हे धाडस न करता चुकीच्या व्यक्तीची साथ/सेवा करणे पसंत करतात.

सत्याचे आणि नैतिकतेचे पाठराखण करणारे माझ्या दृष्टीने आदरणीय उदाहरण म्हणजे.. महाबलाढ्य अशा कौरवांच्या सभेत द्रौपदीचे वस्त्रहरण होताना सगळे रथी,महारथी खाली मान घालून बसले होते कारण दुर्योधनाच्या विरोधात जाण्याचे धाडस कोणाच्यातही नव्हते. पण दुर्योधनाचा २१ वा सावत्र भाऊ विकर्ण या एकट्याने या नीच कृत्याला धाडसाने विरोध केला होता.त्याचे परिणाम म्हणून पुढे महाभारत घडले आणि त्यालाही त्याच्या भावाकडून म्हणजे कौरवांकडून लढावे लागले..युद्धात तो ही मारला गेला..पण पांडवांनी त्याला उतरून आदराने नमस्कार केला.आणि तो त्या कृतीने अजरामर झाला.

रावण/बिभीषण,कौरव/पांडव तसेच कंस,शिशुपाल, श्रीकृष्ण हे सगळे आप्त होते पण प्रत्येकाच्या बुद्धीप्रमाणे त्यांनी कर्म केले. वाईट प्रवृत्ती विरुद्ध नष्ट करण्यासाठी आपल्याच लोकांविरुद्ध लढावे लागले तरी शेवटी सत्याचाच विजय होतो. या साठी मनापासून देवाकडे योग्य प्रार्थना करणे जरुरीचे आहे ना? मला वैयक्तिक शांताबाई जावळे या ताईनी आपल्या मुलाच्या वाढदिवसादिवशी लिहिलेली ही प्रार्थना खूप आवडते कारण माझ्याही त्याच भावना आहेत..

तू बुद्धी दे,तू तेज दे, नवचेतना विश्वास दे
जे सत्य सुंदर सर्वथा आजन्म त्याचा ध्यास दे ध्रु

हरवले आभाळ ज्यांचे हो तयांचा सोबती
सापडेना वाट ज्यांना हो तयांचा सारथी
साधना करती तुझी जे नित्य सहवास दे१

जाणवाया दुर्बलांचे दुःख आणि वेदना
तेवत्या राहो सदा रंध्रातूनी संवेदना
धमन्यातल्या रुधिरास या खल भेदण्याची आस दे
सामर्थ्य या शब्दाचा आणि अर्थ या जगण्यास दे २

सन्मार्ग आणि सन्मती लाभो सदा सत्संगती
नीती ना ही भ्रष्ट हो जरी संकटे आली किती
पंखास या बळ दे नवे, झेपावण्या आकाश दे३

***

# संस्कार भारतीच्या नूतन महानगर समितीची घोषणा

## अध्यक्षपदी माधुरी घोंड सचिवपदी सचिन नेवपूरकर




**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** संस्कार भारतीची बैठक दत्ताजी भाले रक्तपेढीच्या सभागृहात आज संपन्न झाली, यावेळी महानगर समितीची घोषणा करण्यात आली. अध्यक्ष-सौ माधुरी धोंड, सचिव- सुजीत नेवपूरकर, कोषाध्यक्ष-ज्ञानेश्वर पाटील, मंचीय कला संयोजक-श्रीपाद पदे, मंचीय कला सहसंयोजक-अनुजा पाठक आणि वृषाली चाटोरीकर, दृश्यकला संयोजक-कैलास आडे साहित्य संयोजक-प्रशांत गौतम, लोककला संयोजक- सौ. अनुराधा पिंगळीकर.

ही कार्यकारिणी संस्कार भारती देवगिरी प्रांत सहकोषाध्यक्ष अँड. संजय घायाळ यांनी जाहीर केली. या बैठकीला देवगिरी प्रांत उपाध्यक्ष, पं. विश्वनाथ दाशरथे,

प्रांत मंत्री श्री शरद दांडगे, प्रांत मंचीय कला संयोजक. डॉ. जयंत शेवतेकर, प्रांत नृत्यकला संयोजक विक्रांत वायकोस, प्रांत दृश्यकला भूअलंकरण संयोजक प्रा.अमीत देशपांडे, प्रांत मंचीय कला नाट्यविधा सह संयोजक गिरीधर पांडे, साहित्य सह संयोजक नारायण पांडव, लोककला सहसंयोजक शेखर भाकरे उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक अँड. घायाळ यांनी केले. बैठकीला मार्गदर्शन डॉ.जयंत शेवतेकर यांनी केले.बैठकीचा समारोप प्रांत उपाध्यक्ष पं.विश्वनाथ दाशरथे यांनी केला. बैठकीचे सुत्र संचालन नारायण पांडव यांनी केले.

या बैठकीला प्रांत पदाधिकाऱ्या शिवाय लक्ष्मीकांत धोंड आणि स्थानिक समितीचे कलासाधक उपस्थित होते.

# बौद्ध संस्कृती निर्माण करण्यामध्ये बौद्ध विहारांची महत्वाची भूमिका

## हॅप्पी सायन्स (जपान)चे साऊथ आशिया खंडाचे प्रमुख कोटा नोगुची यांचे प्रतिपादन

## बुद्ध विहारांचे ३ रे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनाची सांगता

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** बौद्ध संस्कृती निर्माण करण्यामध्ये बौद्ध विहारांची महत्वाची भूमिका असून बुद्ध विहार हे शिक्षणाचे, ज्ञानाचे केंद्र झाले पाहिजे. केवळ भारतातील बौद्ध विहारांच्या समन्वयाबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील बौद्ध विहारांमध्ये समन्वय साधण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. जेणेकरून बौद्ध संस्कृती जगभरामध्ये रुजविण्यामध्ये महत्वाचा वाटा आपण उचलू शकू, असे प्रतिपादन हॅप्पी सायन्स, साऊथ आशिया खंडाचे प्रमुख कोटा नोगुची (जपान) यांनी केले. ते बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित दोन दिवसीय बुद्ध विहारो का ३ ऱ्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोपीय सत्रातून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. ए. वाहुळ हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन, चरित्र व साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, भदंत डॉ. चंद्रबोधी, डॉ. सय्यद रफिक पारनेर, बहुजन संघटनचे प्रमुख राहुल खांडेकर, इंजि. अशोक येरेकर, प्राचार्य सुनील वाकेकर, चेतन कांबळे, ॲड. एस. आर. बोडदे, आदि उपस्थित होते.

प्रास्ताविक करतांना अशोक सरस्वती बौद्ध म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीमध्ये बुद्ध विहारांचे ३ रे राष्ट्रीय अधिवेशन २२ राज्यातील प्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवून यशस्वी केले. या अधिवेशनाच्या नियोजनात प्रा. भारत सिरसाट, प्राचार्य सुनील वाकेकर, चेतन कांबळे, राहुल खांडेकर, किशोर सरोदे, विजय बचके यांनी अथक मेहनत घेतली. त्यांच्यामुळेच हे अधिवेशन यशस्वी होऊ शकले.

डॉ. सय्यद रफिक पारनेर बोलतांना म्हणाले की, बुद्ध धम्माच्या आणि मुस्लिम धर्माच्या शिकवणीमध्ये साम्य आहे. त्यामुळे बुद्ध विहार आणि मस्जिद यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याची गरज आहे, त्यासाठी येत्या काळात यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या




सुरुवातीला सकाळी ८.०० वाजता पू. भदंत डॉ. चंद्रबोधी आणि उपस्थित भिक्खू संघाच्या उपस्थितीत बुद्ध वंदना व सुत्तपठन घेण्यात आले. त्यानंतर अशोक सरस्वती बौद्ध यांच्या अध्यक्षतेखाली खुले चर्चासत्र संपन्न झाले त्यामध्ये प्रदीप चकमा (त्रिपुरा), भेरुलामा बौद्ध (राजस्थान), देवी दयाल फुले (हरियाणा), राजेंद्र भालशंकर (नाशिक ), कैलासचंद खाडिया (राजस्थान), मिलिंद माटे(गोवा), सुब्रम्हणी (तमिळनाडू), बनवरीलाल (दिल्ली), डॉ. ओंकार वानखडे, शशिकांत सिंहजी मोहनन (तामिळनाडू), विनोद बौद्ध बिहार, राजेंद्र नरहरी (तेलंगणा), प्रा. बी के खातरकर (मध्य प्रदेश), महेंद्र बुद्धरत्न, विमलभाई मकवाना (गुजरात), ज्ञानप्रकाश बौद्ध (गुजरात), ओमप्रकाश चौधरी (छत्तीसगड, ए के पाटील (पाली परीक्षार्थी), प्रा. घनश्याम धाबर्डे (लेणी संवर्धन), सावित्री मुकुंद नाखले आदींनी सहभाग नोंदवला. बौद्ध विहारांचे समन्वय अधिक व्यापक पद्धतीने करून बुद्ध विहार संस्कृती टिकविण्याची जबाबदारी कशापद्धतीने केली पाहिजे यावर व्यापक स्वरूपात चर्चा झाली. प्राचार्य डॉ. एम.ए. वाहुळ बोलतांना म्हणाले की, देशभरातील बुद्धाना एकत्रित करण्याच्या हेतूने बुद्ध विहारांचे ३ रे राष्ट्रीय अधिवेशन आज संपन्न होत आहे. आपण आपली संस्कृती निर्माण करण्यासाठी, सामाजिक बदलासाठी व्यापक पातळीवर काम करण्याची गरज असून त्याची सुरुवात उशिराने का होईना मात्र बुद्ध विहार समन्वय समितीने केली असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भारत सिरसाट यांनी केले तर आभार अमरदीप वानखडे यांनी मानले.

### पारित करण्यात आलेले ठराव

१) महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.
२) ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी बौद्धांनी सार्वजनिक, खासगी तसेच मिरवणुकीमध्ये डी. जे. चा वापर करू नये.
३) पाली विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी.
४) विदेशातून भारतात आणण्यात येणाऱ्या बुद्ध मूर्तीवरील कस्टम ड्युटी, सीमा शुल्क रद्द करण्यात यावे.
५) बौद्धांनी लग्नप्रसंगी उपजातींना मान्यता देऊ नये, असे केल्यास त्या व्यक्तीवर सामाजिक बहिष्कार घालण्यात यावा.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559